Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7SE), 261–266

# RELEVANCE OF MAHATMA GANDHI'S SOCIAL AND POLITICAL THOUGHTS: A PHILOSOPHICAL STUDY

# महात्मा गांधी यांच्या सामाजिक व राजकीय विचारांची प्रासंगिकता: एक तात्त्विक अध्ययन

Dr. Manoj Uttamrao Patil [1]

[1] Philosophy Department Head, Padmashree Vikhe Patil Arts, Science and Commerce College, Pravaranagar Ta. Rahata ji. Ahilyanagar, Maharashtra, India

https://crossmark.crossref.org/dialog/?doi=10.29121/shodhkosh.v5.i7se.2024.5885&domain=pdf&date_stamp=2024-07-31

**Corresponding Author**

Dr. Manoj Uttamrao Patil,
akshymanoj@gmail.com

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5885

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** Mohandas Karamchand Gandhi alias Mahatma Gandhi was a great person in the field of non-violence, peace and humanitarianism. He played a notable role in the peace and freedom movement. He expressed many ideas related to socio-political changes in Mandalay. Gandhiji's ideas are fundamentally philosophical. Because of this, various great philosophers of the world were inspired. Mahatma Gandhi proposed many social, political, educational and economic concepts to bring positive change in society. By practicing his thoughts, you assimilate new ideas. Undoubtedly, Gandhiji would have been a social engineer. Who tried to create a new human society where everyone can live peacefully. In matters of social change, Gandhi always tried to establish a welfare state (Ramrajya) through truth and non-violence.
Sarvodaya means welfare of all / rise of all. Universal welfare was his last dream. According to him, one cannot achieve anything through violence. Because violence leads to destruction of both you and your enemy; But non-violence is always beneficial for both. Truth and non-violence help you to purify your soul. Mahatma Gandhi's society always tried to bring about change in a non-violent and peaceful way. Gandhiji's society played a huge role in making the society understand the power of truth, non-violence, love and equality of all religions or virtues. An effort or research work will be done to understand the relevance of various socio-political principles and philosophies of Mahatma Gandhi.

**Hindi:** मोहनदास करमचंद गांधी उर्फ महात्मा गांधी हे अहिंसेच्या शांततेच्या आणि मानवतावादाच्या क्षेत्रातील एक थोर व्यक्ती होते. त्यांनी शांतता आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत उल्लेखनीय भूमिका बजावली. सामाजिक-राजकीय परिवर्तनाशी संबंधित अनेक कल्पना त्यांनी मांडल्या. गांधींजींचे विचार मुळात तात्त्विक आहेत. कारण ते जगातील विविध महान तत्त्वचिंतकानी प्रेरित होते. महात्मा गांधींनी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक संकल्पना मांडल्या. त्याच्या विचाराचा अभ्यास करून आपण नवीन कल्पना आत्मसात करतो. निःसंशय, गांधीजी एक सामाजिक अभियंता (Social Engineer) होते. ज्यांनी एक असा नवीन मानवी समाज तयार करण्याचा प्रयत्न केला जिथे प्रत्येकजण शांततेने जगू शकेल. सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत गांधींनी नेहमीच सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने कल्याणकारी राज्य (रामराज्य) स्थापन करण्याचा प्रयत्न केला.
सर्वोदय म्हणजे सर्वांचे कल्याण / सर्वांचा उदय होय. सर्वाचे कल्याण हे त्यांचे अंतिम स्वप्न होते. त्यांच्या मते, हिंसेने आपण काहीही मिळवू शकत नाही. कारण हिंसेमुळे आपला व शत्रूचा दोघांचाही नाश होतो; पण अहिंसा ही नेहमी दोघांच्याही फायद्याची असते. सत्य आणि अहिंसा आपल्याला आपला आत्मा शुद्ध करण्यास मदत करतात. महात्मा गांधीजींनी समाजात नेहमीच अहिंसक व शांततापूर्ण मार्गाने बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला, गांधीजींनी समाजाला सत्य, अहिंसा, प्रेम आणि सर्वधर्म समभाव या सद्गुणांची शक्ती समजून देण्यासाठी फार मोठा हातभार लावला. महात्मा गांधींजींच्या विविध सामाजिक-राजकीय तत्त्वांची व तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता समजून देण्याचा प्रयत्न या शोधकार्यातून केला जाणार आहे.

**How to cite this article (APA):** Patil, M. U. (2024). Relevance of Mahatma Gandhi's Social and Political Thoughts: A Philosophical Study. *ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts, 5*(7SE), 261–266. doi: 10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5885

**Keywords:** Mahatma. Gandhi, Socio-Political Philosophy, Non-Violence, Truth, Satyagraha, Sarvodaya, Civil Disobedience, महात्मा. गांधी, सामाजिक-राजकीय तत्त्वज्ञान, अहिंसा, सत्य, सत्याग्रह, सर्वोदय, सविनय कायदेभंग

## 1. प्रस्तावना

मोहनदास करमचंद गांधी (1869-1948) हे आपल्या काळातील एक महान व्यक्ती असून त्यांना ‘राष्ट्रपिता’ म्हणूनही संबोधले जाते. गांधींजींनी भारतातील २० व्या शतकात संपूर्ण भारतातील राष्ट्रवादी संघर्षाचे नेतृत्व केले. म. गांधीजींनी राजकारणाला नैतिक आधाराची गरज व्यक्त केली होती. ज्यात त्यांनी ब्रिटिश साम्राज्यवाद, अस्पृश्यता आणि सांप्रदायिक विसंवाद यांच्याविरुद्धच्या अहिंसक लढ्यांमध्ये सर्व भारतीयांना समाविष्ट करून घेतले. आणि त्यामाध्यमातून गांधीजींनी सामान्य जनतेला राजकारणासाठी नैतिकता आणि व्यावहारिकतेची संकल्पना मांडली. गांधींच्या राजकीय तत्त्वज्ञानाने तत्कालीन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले, ज्याचा प्रभाव हा त्याकाळी संपूर्ण भारतावर होता. इतकेच नव्हे तर त्यांच्या या तत्त्वज्ञानाला ‘गांधीवाद’ असे नामकरणही झाले. नंतर हा गांधीवाद संपूर्ण जगाने स्वीकारला. गांधींजींनी चंपारण, खेडा, साबरमती आणि अहमदाबादमध्ये स्थानिक समस्यांबद्दल लोकांना संघटित करून अहिंसक मार्गाने लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला. गांधींच्या भूमिकेचे वर्णन करताना, पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात, “Gandhiji knew India far better than we did, and a man who could command such tremendous devotion and loyalty must have something in him that corresponded to the needs and aspirations of the masses” (Nehru 1941; 254-55).

गांधी हे निर्विवाद असे तत्त्वज्ञ होते ज्यांनी आपल्या तत्त्वसामर्थ्याने केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला प्रभावित केले आहे. याव्यतिरिक्त, गांधींनी स्वत: ‘इंडियन ओपिनियन, यंग इंडिया, हरिजन’ इत्यादींमध्ये समकालीन प्रासंगिकतेच्या मुद्द्यांवर विपुल लेखनही केले. त्यांचे बोलणे, वागणे आणि लिहिणे अगदी स्पष्ट आणि सोपे आहे यात कोणत्याही प्रकारचा विरोधाभास नव्हता. यासंदर्भात गांधींजीवर - घरातील मोलकरीण रंभा ते प्रख्यात विचारवंत रस्किन, महादेव गोविंद रानडे आणि टॉल्स्टॉयपर्यंत अनेक व्यक्तींचा प्रभाव होता, ज्याची त्यांनी स्वतःच “The story of my experiment with truth” या आपल्या आत्मचरित्रात कबुली दिली आहे. जरी आधुनिक पाश्चात्य सभ्यतेवर आणि वासनायुक्त पैलूंवर गांधीजींनी टीका केली असली तरीही त्यांनी हे मान्य केले आहे की, "अहिंसेबद्दलचे माझे मत हे माझ्या पाश्चात्य शिक्षणाचे परिणाम आहेत हे सांगण्यात मला लाज वाटण्यासारखे काही नाही" (गांधी: 1976; 109).

## 2. संशोधनाची पद्धती

जागतिक घडामोडींमध्ये सध्याच्या विस्कळीत परिस्थितीमुळे नवीन पिढ्यांसाठी गांधीवादी तत्त्वज्ञानात सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली आहे. म. गांधीजींना हे केवळ शैक्षणिक तत्त्वज्ञानातच नव्हे तर मानवी व्यवहाराच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच अध्यात्मिक अशा विविध पैलूंवरसुद्धा रस होता. गांधीजींना भारतीय तत्त्वज्ञानाची तसेच पाश्चात्य तत्त्वज्ञानाची चांगली जाण होती. एवढेच नव्हे तर टॉल्स्टॉय, रस्किन, इमर्सन आणि थोरो यांचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता.

गांधींचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान हे बहुआयामी आहे. त्याचे जरी सार भारतीय सभ्यतेतून ( भगवदगीता ) घेतले गेले असले तरी त्याची वास्तविक उत्क्रांती मात्र दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या अनुभवांवरून घडली. त्यांचे सामाजिक आणि राजकीय विचार हे भारताच्या विचित्र सामाजिक-आर्थिक परिस्थितीच्या मुद्द्यांशी संबंधित आहे. संपूर्ण गांधीवादी तत्वज्ञान "सत्य" आणि अहिंसा या दोन आधार स्तंभावर उभे आहे,

गांधींच्या मते, “साधने प्रामाणिक असल्याशिवाय साध्य किंवा धेय्य न्याय्य ठरू शकत नाही. त्यांचा असा विश्वास होता की, जर राजकारणाच्या क्षेत्रात आंतरिक नैतिकता हा आदर्श मार्गदर्शक नसेल तर शरीर हा एक उरलेला सांगाडा असून तो निरुपयोगी आहे ; नैतिक मूल्यांच्या भावनेशिवाय राजकारणाला आधार नाही.”

राजकारणात धर्माची भूमिका महत्त्वाची असावी; असे म्हणून गांधीजींनी भारतातील जनराजकारणाचे आध्यात्मिकीकरण केले. एका अर्थाने हा एक क्रांतिकारी विचार होता ज्याने विशिष्ट सामाजिक आणि राजकीय संरचना बदलण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले होते. परंतु त्यांनी क्रांतीशी संबंधित स्वीकारलेले मार्ग हे मात्र अहिंसक होते. त्याच्या ‘सत्य’ आणि ‘अहिंसा’ ह्या दोन गोष्टी मानवतेला पोषक होत्या. त्यांनी हिंसेशिवाय अहिंसेचा आग्रह धरला; शत्रुत्व संपवण्यासाठी शत्रूचे मन वळवून त्याला सन्मार्गाने मित्रात्वात्त परिवर्तीत करणे आणि समेट घडविणे ; आर्थिक अन्याय दूर करण्यासाठी विश्वस्तपद ( Trusteeship ) ; सामाजिक असमानता नष्ट करून त्या जागी सर्वधर्मसमभाव निर्माण करणे व समाजाला त्याबद्दल जागरूक करणे; निसर्ग हा मानवजातीचा संरक्षक म्हणून त्याचा आदर करणे ; माणसाच्या निसर्गावरील अत्याचाराचा अंत करणे आणि त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीने आपापल्या इच्छा मर्यादित करणे हे सर्व त्यांच्या राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाच्या मुख्य बाबी आहेत. गांधींनी एकाच वेळी ब्रिटीश राजवटीविरुद्ध राजकीय चळवळी सुरू केल्या तर सामाजिक जीवनात ही त्यांनी अत्याचारी सामाजिक संरचनेविरुद्ध, विविध चालीरीती, नियम आणि मूल्यांच्या विरोधातदेखील त्यांनी सामाजिक लढा दिला. म्हणून, गांधीवादी तत्त्वज्ञान हे पूर्णपणे राजकीय किंवा पूर्णपणे सामाजिक मानले जात नाही, परंतु दोघांचे जटिल मिश्रण मानले जाते. (चक्रवर्ती आणि पांडे: 2009; 43).

वरील मते लक्षात घेऊन, या शोधनिबंधात महात्मा गांधींचे सामाजिक-राजकीय तत्त्वज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह आणि सर्वोदय यांसारख्या गांधीवादी तत्त्वज्ञानाच्या काही मूलभूत संकल्पनांचे आणि सध्याच्या संदर्भात त्यांची वास्तविकता आणि प्रासंगिकता यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न यात केला आहे. गांधीजींचे लेखन आणि विविध स्रोत, संदर्भ पुस्तके, मासिके आणि नियतकालिकांमधून गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक दोन्ही पद्धती वापरल्या जातात.

# 3. म. गांधीजींची 'अहिंसा' संकल्पना

गांधींची संपूर्ण श्रद्धा ही त्यांच्या तात्विक अहिंसेवर अवलंबून आहे. अहिंसेचा शाब्दिक अर्थ 'कोणालाही दुखापत न करणे' असा होय. परंतु या अहिंसेत कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तिन्ही प्रकारच्या अहिंसेचा समावेश होतो. आणि म्हणूनच हत्या न करणे- ही एक कायिक अहिंसा आहे, कोणालाही अपशब्द न बोलणे ही वाचिक अहिंसा होय, तर कोणाचेही मन दुखावेल असे वर्तन न करणे ही मानसिक अहिंसा होय. या तिन्ही प्रकारच्या हिंसेचा परित्याग म्हणजे 'अहिंसा' होय. शिवाय गांधीजींच्या मते, अहिंसा म्हणजे कोणत्याही आसक्तीशिवाय केलेले प्रेम होय आणि हे केवळ दुर्भावना आणि निष्क्रियतेशिवाय शक्य आहे. त्याचबरोबर अहिंसेत भितीऐवजी सहिष्णुता आणि भ्याडपणाशिवाय शांतता, राग, शत्रुत्व, आनंद आणि वेदना यांसारख्या सर्व आकांक्षांपासून मुक्त असलेली ही एक जीवनपद्धती आहे. अहिंसा कधीही स्थिर नसून सतत बदलणारी आहे. अहिंसा मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा स्वीकार करते. (जॉर्ज 1973: 6; कुमार 2010: 45).

दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी अहिंसेचे तत्त्व लागू करण्यासाठी गांधीजी आग्रही होते. 'नैतिक साधनांना योग्य स्थान मिळणे' या सार्वभौमिक सिद्धांताच्या आधारे सर्व कार्ये चालावेत हे जीवनाचे ध्येय त्यांनी बनवले. गांधींनी अहिंसेचा अर्थ पुन्हा परिभाषित केला. त्याच्यासाठी, त्यांनी अहिंसेचे "निष्क्रिय अहिंसा आणि सक्रिय अहिंसा" असे दोन प्रकार केले आहेत. कोणत्याही सजीवांना हानी पोहोचवणे आणि नाश करण्यापासून परावृत्त करणे या प्रकारच्या अहिंसेस 'निष्क्रिय अहिंसा' तर सर्वांच्या कल्याणास सकारात्मकरित्या प्रोत्साहन देणे याला 'सक्रीय अहिंसा' असे म्हटले आहे. " (पारेख 1999: 130; चक्रवर्ती आणि पांडे: 44).

यावरून असे सूचित होते की अहिंसेचा अर्थ गांधींना केवळ "इतरांना इजा न करणे" हा नकारात्मक किंवा निष्क्रीय अर्थ नव्हता; त्याऐवजी, त्याचा प्रेम आणि दानाचा सकारात्मक अर्थ देखील होता.ते म्हणतात: "...त्याच्या नकारात्मक स्वरूपात, (अहिंसा) म्हणजे शरीराने किंवा मनाने कोणत्याही जीवाला इजा न करणे. म्हणून, मी कोणत्याही चुकीच्या व्यक्तीला दुखावू शकत नाही किंवा त्याच्याबद्दल कोणतीही वाईट इच्छा सहन करू शकत नाही किंवा त्याला मानसिक त्रास देऊ शकत नाही. त्याच्या सकारात्मक स्वरूपात, अहिंसा म्हणजे सर्वात मोठे प्रेम, सर्वात मोठे दान. जर मी अहिंसेचा अनुयायी आहे, तर मी माझ्या शत्रूवर किंवा माझ्यासाठी अनोळखी व्यक्तीवरही प्रेम केले पाहिजे. जसे मी माझ्या चुकीच्या असलेल्या वडीलांवर किंवा मुलावर प्रेम करतो. गांधीजींच्या सक्रिय अहिंसेमध्ये अनिवार्यपणे सत्य आणि निर्भयता यांचा समावेश होतो (गांधी: 1916; अय्यर 1973: 179-80; चक्रवर्ती आणि पांडे: 44).

अशाप्रकारे, गांधींजींनी अहिंसेची व्याख्या दोन प्रकारे केली: एकीकडे, संकुचित अर्थाने त्यांनी अहिंसा याचा अर्थ 'इतरांना इजा करणारी कृत्ये टाळणे' असा केला; तर विस्तृत व सकारात्मक अर्थाने, 'त्यांनी सर्वांवर अनंत प्रेम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. याअर्थाने गांधींजींनी 'अहिंसा' हा शब्द समजून घेतला आणि समाजात तो रूढ केला. जवाहरलाल नेहरूंच्या मते, अहिंसा म्हणजे "एक सकारात्मक आणि गतिमान कृतीची पद्धत आहे." आणि "सर्वात सभ्य आणि कमीतकमी आक्षेपार्ह पद्धतीने वापरण्यात येणारे सक्तीचे शस्त्र आहे. " (नेहरू 1941: 540)".

गांधींजींसाठी, अहिंसा सर्वोच्च नैतिक मूल्यांवर आधारित होती, ज्याचे प्रतीक "निःस्वार्थी स्व" मध्ये आहे. गांधींजींच्या मते, अहिंसा हे दुर्बलांचे शस्त्र नसून बलवानांचे शस्त्र आहे, त्यांचा ठाम विश्वास होता की, अहिंसा आत्मसन्मानाचे रक्षण करते आणि अनैतिक कृत्यांना प्रतिबंध करते. त्याच्यासाठी 'सत्य' हेच ध्येय आणि 'अहिंसा' हेच साधन होते. गांधींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगात, अहिंसेमुळे त्यांना विरोधात असलेल्या लोकांबद्दल वाईट भावना पूर्णपणे टाळून त्यांनी वसाहतविरोधी राजकारणाची नवीन संकल्पना अंमलात आणली. परंतु ते अत्यंत सावध होते कारण त्यांनी "माझ्याकडील अहिंसा हा एक शस्त्र आहे, श्वास आहे. तो राजकीय जीवन जगण्याचा एक आधार म्हणून भारतापुढे ठेवत नाही तर त्यांनी अहिंसेला वैयक्तिक जीवनाचे एक अंग म्हणून त्याचा स्वीकाले. त्यामुळे व्यावहारिक समस्या सुटण्यास अहिंसेची मदत होऊ शकते. (गांधी, पँथम 1987 मध्ये उद्धृत: 302-03).

अशा प्रकारे, गांधींनी अहिंसा हे व्यावहारिक समस्या सोडवण्यासाठी वापरण्यात येणारे राजकीय शस्त्र म्हणून काँग्रेससमोर ठेवले होते. असे असले तरी, अहिंसेचा विचार हा गांधीजींचा स्वत:चा विचार नाही तर तो त्यांनी विशेषतः गौतम बुद्धांकडून घेतले आहे आणि अनेक हिंदू परंपरांनी अहिंसेच्या वापराचे समर्थन केले आहे. पुढे त्यांना ही शिकवण अवास्तव आणि पटणारी नाही असे दिसते कारण आधुनिक आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि राजकारणाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ते अपयशी मानले जावू लागले.

## 4. म. गांधीजींची 'सत्याग्रह'' संकल्पना

महात्मा गांधीजींच्या अहिंसेच्या सिद्धांताप्रमाणेच सत्याग्रहाच्या सिद्धांतालाही अतिशय व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. शब्दशः याचा अर्थ 'सत्याचा आग्रह धरणे' होय. हे "स्वत: यातना सहन करून स्वत:चे अधिकार सुरक्षित करण्याची पद्धत म्हणजे सत्याग्रह होय". सत्याग्रहात शस्त्राने प्रतिकार करण्यास विरोध केला आहे. म्हणून, सत्याग्रह हा केवळ निष्क्रिय प्रतिकार नसून लोकांची तीव्र सक्रीय प्रतिक्रिया आहे. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह हे अहिंसक लढ्याचे शक्तिशाली शस्त्र आहे. सत्याच्या निर्मितीसाठी हा एक प्रकारचा नैतिक दबाव आहे. गांधींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान हे सत्याच्या सर्वोच्च संकल्पनेचा नैसर्गिक परिणाम आहे. त्यासाठी सराव, स्वयंशिस्त आणि सर्व प्रकारचे दु:ख सहन करण्याची तयारी आवश्यक आहे. गांधींनी हे शस्त्र त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील प्रयोगात आणि रौलट कायद्याविरुद्धच्या आंदोलनात वापरले. त्याला 'प्रेम-शक्ती' (Love-force) असेही म्हटले.

गांधींनी सत्याग्रहाच्या यशासाठी काही अटी पाळल्या –

1) सत्याग्रहींच्या मनात प्रतिस्पर्ध्याबद्दल द्वेष नसावा.
2) सत्याग्रही हा ज्या मुद्यावर आग्रही आहे. तो मुद्दा खरा आणि ठोस असला पाहिजे.
3) सत्याग्रही त्याच्या उद्दिष्टप्राप्तीपर्यंत दु:ख सहन करण्यास तयार असले पाहिजे (हरिजन, 31-03-1946: 64; कुमार: 78 मध्ये उद्धृत).
4) सत्याग्रहींनी हिंसा न करता न्याय्य कारणासाठी उभे राहिले पाहिजे. हिंसाचार केला तर न्याय्य कारणाचा पराभव होतो.
5) विचार, वाणी किंवा कृतीत कोणत्याही स्वरूपातील हिंसाचाराचा वापर त्याने टाळावा. सत्याग्रह हा इतरांच्या भल्यासाठी असावा तो वैयक्तिक फायद्यासाठी केला जाऊ शकत नाही.

सत्याग्रहाची पद्धत-आत्म्याचे शुद्धीकरण; विविध प्रकारचे असहकार ; सविनय कायदेभंगाच्या पद्धती; विधायक कार्यक्रम या चार प्रकारांमध्ये विभागली जाऊ शकते.

गांधींच्या मते, सत्याग्रह म्हणजे 'संघटित प्रतिकार' आणि "अन्यायकारक कायदे" किंवा "अन्यायकारक सरकार" यांचा सविनय कायदेभंग करणे होय. एखाद्या व्यक्तीला अनैतिक अशा राजकीय कायद्यासाठी सविनय कायदेभंग करण्याचा किंवा विरोध करण्याचा नैतिक अधिकार आहे. सत्याग्रही हा सामान्यतः कायद्याचे पालन करणारा नागरिक असतो. परंतु जेंव्हा एखादा कायदा अन्यायकारक असेल तेव्हा कोणत्याही व्यक्तीला राज्याच्या त्या कायद्याचा विरोध करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

अशाप्रकारे, सत्याग्रह हा बलवान आणि शूर लोकांचा सिद्धांत आहे. आणि ज्याने सत्याग्रहीला त्याच्या मार्गात येणाऱ्या कोणत्याही धोक्याचा सामना करण्याची शक्ती आणि धैर्य मिळते. अहिंसक स्वरूपाच्या भारतीय स्वातंत्र्यचळवळीत गांधींनी ते तंत्र म्हणून स्वीकारले. यासंदर्भात गांधींजींनी असे म्हटले आहे कि, "आम्ही प्रशासकांवर सशस्त्र हल्ले करू इच्छित नाही किंवा त्यांना सत्तेवरून हटवू इच्छित नाही, परंतु केवळ अन्यायापासून मुक्त होण्यासाठी आम्ही सत्याग्रहाचा वापर करीत आहोत." (गांधी 1971: 523; पांडे आणि चक्रवर्ती: 46).

गांधीजींचे सत्याग्रहाचे तंत्र तर्कसंगत, आध्यात्मिक आणि आधिभौतिक आहे. तथापि, व्यवहारात ते लक्षात घेणे फार कठीण आणि अशक्य आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते मानवी स्वभाव आणि वर्तनाच्या विरुद्ध आहे आणि सर्व परिस्थितींमध्ये ते लागू पडू शकत नाही.

## 5. म. गांधीजींची 'सर्वोदय' संकल्पना

आणखी एक उल्लेखनीय सिद्धांत म्हणजे सर्वोदय. ज्याला गांधींनी खूप महत्त्व दिले. थोडक्यात सर्वोदय म्हणजे सर्वांचे उत्थान आणि सर्वांचे कल्याण. ही एक सामाजिक संकल्पना आहे. कारण ती समाज आणि त्याच्या विकासावर भर देते. गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात प्रथमच 'सर्वोदय' हा शब्द वापरला आणि जॉन रस्किनच्या "UN TO THE LAST" या शब्दाचा त्यांनी गुजराती अनुवाद केला. त्यात गांधींनी 'सर्वोदय' हा शब्द स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आदर्श म्हणून वापरला.

सर्वोदयामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा समावेश होतो आणि राज्य यंत्रणेला विरोध केला आहे. गांधींनी सांगितले की, राज्य हे बळजबरीचे आणि शोषणाचे साधन आहे. तसेच राज्य हे सत्तेच्या बळावर आणि संघटित हिंसाचारावर आधारित आहे ; तर सर्वोदय सत्तेच्या राजकारणाची जागा सहकाराच्या राजकारणाने घेऊ पाहत आहे. 'सर्वोदय' ही संकल्पना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात- सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक- सर्वांना चांगले जीवन सुनिश्चित जीवन प्रदान करते. सर्वोदय हिंसेपासून दूर राहतो कारण त्यामुळे हिंसाचाराचा प्रतिकार होतो. 'सर्वोदय' आणि 'समाजवाद' दोघांचा सामाजिक समतेवर विश्वास असला तरी यात फरक आहे. सर्वोदायाचे उद्दिष्ट हे सत्य, प्रेम आणि अहिंसेद्वारे समाजात स्वातंत्र्य, समानता आणि न्याय सुनिश्चित करणारी शासन व्यवस्था स्थापन करण्याचे आहे. गांधी वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या मूल्यांवर भर देतात जे समाजवादात शक्य नाही.

रस्किनसाठी, कामगार, मध्यमवर्गीय माणूस आणि उच्च पदावरील माणूस यांच्या वेतनात जरी फरक असला तरी त्यांच्या सन्मान आणि मानवी प्रतिष्ठेचा फरक नाही; आणि गांधींनीही तेच मत व्यक्त केले. गांधींच्या मते, सर्वोदयाचा अर्थ असा आहे की,

1) व्यक्तीचे भले सर्वांच्या भल्यामध्ये सामावलेले आहे;

2) मजुराच्या कामाचे मूल्य न्हाव्याच्या कामासाराखेच आहे जितके सर्वांना त्यांच्या कामासाठी उपजीविका मिळवण्याचा समान अधिकार आहे; आणि

3) मजुराचे जीवन कलाकाराचे जीवन हे सारखेच जीवन आहे (गांधी 1976: 124).

गांधींनी ही तत्त्वे आचरणात आणण्याचा संकल्प केला.

सर्वोदय ही संकल्पना सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्येवर उपाय आहे. ही एक मानवतावादी आणि आदर्शवादी संकल्पना आहे जी समाजाच्या विकासाशी जोडलेली आहे. ज्यामध्ये माणूस एक भाग आहे. सर्वोदायाच्या सहाय्याने व्यक्ती आणि समाजाची पूर्तता आणि सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जातो. (कुमार: 63). सर्वोदय माणसाला त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो आणि समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करण्यास मदत करतो. हे अहिंसेशी सुसंगत आहे जे "इतरांना जगण्यास मदत करण्यासाठी जगा" असे प्रतिपादन सर्वोदायात केले जाते. या सर्वोदय संकल्पनेच्या सहाय्याने गांधींनी एक असा आदर्श समाज स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवले जेथे विविध जातीं धर्मांचे लोक एकत्र येऊन बंधूभावाने राहू शकतील.

सर्वोदय संकल्पनेवर काहींना टीका केली आहे. त्याच्या मते, सर्वोदयाची संकल्पना अवास्तव आणि काल्पनिक असून यात मानवाला सद्गुणांचे प्रतीक मानले आहे. याही पुढे जाऊन ही राज्यासाठी “जबरदस्तीचे साधन" म्हणून सर्वोदय दृष्टिकोनावर टीका केली गेली ; कारण लोकशाही राज्य लोकांच्या भौतिक कल्याणाला चालना देण्यासाठी एक साधन म्हणून काम करू शकते.

## 6. निष्कर्ष

नि:संशयपणे, गांधींचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान क्रांतिकारी होते. जे आजसुद्धा प्रासंगिक आणि वैध आहे. गांधींचा सामाजिक आणि राजकीय सिद्धांत केवळ राज्याच्या विरोधातच नव्हता, त्यात एकत्रीकरणाच्या घटनात्मक आणि अतिरेकी पद्धतींच्या विरोधातही होता. तरी मानवी स्वभावाशी संबंधित राजकीय असलेल्या सामाजिक आणि आर्थिक बाबींवर जोरही होता. गांधींचे तत्वज्ञान हे सामाजिक बदल आणि राजकीय कृतीची अत्यंत मौलिक आणि सर्जनशील संकल्पना होती. त्यांनी स्वातंत्र्याच्या लढ्याचे स्वरूप केवळ सर्जनशीलपणे परिभाषित केले नाही तर राजकीय एकत्रीकरणासाठी एक सुव्यवस्थित रचना देखील प्रदान केली. शासक आणि शासित आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या विशेषाधिकारप्राप्त वर्गांमधील मतभेद आणि संघर्षांना सामोरे जाण्यासाठी त्यांचे तत्त्वज्ञान अत्यंत मानवी आणि सर्जनशील होते.

गांधींच्या संकल्पनेतील सर्वात वेगळेपणा म्हणजे तर्कशुद्ध चर्चा आणि अनुनय यांचे महत्त्व होय. गांधी त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेले होते हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. नेल्सन मंडेला आणि त्यानंतरचे दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्रपती श्री. डी. क्लर्क यांच्या मते, मानवी हक्क आणि नागरी स्वातंत्र्यासाठीचा लढा हा गांधीवादी तंत्राचा पूर्णपणे अवलंब करून केला आहे. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधींनी नोंदवलेले अभूतपूर्व यश, सलोखा आणि क्षमाशीलतेचा मार्ग स्वीकारण्यात गांधींचाही त्यांच्यावर प्रभाव होता, हे निश्चितपणे दिसून येते की गांधींनी दक्षिण आफ्रिकेत बरीच वर्षे व्यर्थ घालवली नाहीत. अमेरिकन खंडात, मार्टिन ल्यूथर किंगचा गांधीवादी धर्तीवर नागरी स्वातंत्र्यासाठीचा लढा आणि गांधींकडूनच त्यांना त्यांचे ऑपरेशनल डावपेच शिकायला मिळाले हेही गांधीवादी डावपेचांच्या प्रासंगिकतेचे वेगळे उदाहरण नाही.

अशा प्रकारे, गांधी हे मूलत: कृतीशील पुरुष होते आणि त्यांच्याकडे असलेल्या सामाजिक दृष्टीनुसार भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या महान कार्यासाठी त्यांनी स्वतःला वचनबद्ध केले. त्यांनी विकसित केलेल्या कल्पना त्यांच्या अनुभव, अंतर्दृष्टी, शिक्षण आणि लिओ टॉल्स्टॉय आणि जॉन रस्किन यांसारख्या महान विद्वानांकडून मिळालेल्या शिकवणींनुसार होती. जेव्हा आधुनिक माणसाला पर्यावरणीय प्रदूषण, अमानवीकरण आणि परकेपणा यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो; आणि द्वेष, हिंसा आणि युद्धापासून माणसाची सुटका नाही अशा राष्ट्रांनी गांधीवादी तत्त्वज्ञान लागू करणे आवश्यक आहे. गांधींनी लागू केलेली तंत्रे सध्याच्या संदर्भात आशय आणि भावनेने पूर्णतः अंमलात आणता येत नसली तरी; तरीही गांधींचे सत्य, अहिंसा, सर्वोदय आणि न्यायासाठीचे समर्पण, त्यांचे धैर्य आणि दृढनिश्चय, अडचणींना तोंड देण्यासाठी लागणारी त्यांची नैतिकता, दीनदलितांबद्दलची त्यांची काळजी आणि मानवतेवरचा त्यांचा प्रचंड विश्वास हे त्यांचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान आजही प्रासंगिक आहेत असे मला. वाटते.

## REFERENCES

Chakrabarty, B. & Pandey, R.K. 2009. Modern Indian Political Thought. Sage Publications, New Delhi.
Gandhi, M.K. 1971. Satyagraha – Not Passive Resistance, in Collective Works of Mahatma Gandhi. Vol. 13. The Publications Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India, New Delhi. –
Gandhi, M.K. 1976. The Story of My Experiments with Truth. Navajivan Publishing House, Ahmedabad. –
Gandhi’s letter in Modern Review, October 1916, reproduced in Chakrabarty, B. & Pandey, R.K. 2009, ibid.
George, K. 1973. Ahimsa – Gautama to Gandhi. Sterling Publishers, New Delhi.
Iyer, R. 1973. The Moral and Political Thought of Mahatma Gandhi. Oxford University Press, New Delhi.
Kumar, C.V. 2010. Gandhi: Humanistic Model. Aknsha Publishing House, New Delhi.
Nehru, Jawaharlal. 1941. An Autobiography. London: John Lane, The Bodley Head.

Pantham, T. 1987. Practical Discourse and Gandhi's Satyagraha, in B. Parekh and T. Panthan (ed), Political Discourse: Explorations in Indian and Western Political Thought, Sage Publications, New Delhi.

Parekh, B. 1999. Colonialism, Tradition and Truth: An Analysis of Gandhi's Political Discourse, Sage Publications, New Delhi.

Harijan (various issues)